# महाराष्ट्र शासन

उदयोग विभाग
जिल्हा उदयोग केंद्र, हिंगोली

# 100 दिवसांच्या कृती आराखडयांबाबत 7 कलमी कृती आराखडयावर करण्यात आलेली कार्यवाही.

# विषय क्र.1- संकेतस्थळ
# अ) वापरण्यातील सुलभता

- उदयोग संचालनालयाचे www.di.maharashtra.gov.in हे संकेतस्थळ असून यावर सर्व माहिती अदयावत केली जाते.
- उदयोजक व नवगुंतवणूकदारांना विभागाच्या सर्व योजनांची माहिती मिळण्यासाठी आणि विविध परवाने मिळविणेसाठी विभागाने Single window system for investor facilitation (MAITRI 2.0) Portal https://maitri.maharashtra.gov.in दि. 4 फेब्रुवारी 2025 रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या शुभ हस्ते कार्यान्वित करण्यात आले आहे.

Government of Maharashtra

**26 February 2025**

**Subject: Launch of MAITRI 2.0 – Ushering a New Era of Industrial Excellence in Maharashtra**

Dear Officer,

We are thrilled to announce that MAITRI 2.0 portal, Maharashtra's most advanced **single-window system for investor facilitation**, was launched by the **Hon'ble Chief Minister on 4 February 2025**. This groundbreaking initiative redefines **ease of doing business**, bringing transparency and efficiency to governance.

**What's New in MAITRI 2.0?**

A **next-generation, AI-powered** online portal dedicated to investor facilitation system, designed to make business operations seamless:

1. **Comprehensive G2B Services** – Access to all industry-related permissions, licenses, and approvals in one place, making business setup and operations faster.
2. **Online Wizard** – Hassle-free guidance for approvals and compliance.
3. **Incentive Calculator** – Enter your company and project details to instantly get eligible incentives, removing the tedious task of reviewing policy documents.
4. **Real-Time Dashboard** – Monitor applications, approvals, and compliance status live.
5. **AI Chatbot** - Get instant responses to queries on policies, incentives, and approvals anytime.
6. **Integrated Call Centre** - Expert support on call to assist investors with queries and concerns.
7. **User Feedback System** – A dedicated platform to share feedback and improve investor services.
8. **Centralized Document Repository** – Securely store documents once and reuse them for multiple applications.
9. **Compliance Dashboard** – Track, manage, and stay updated on all regulatory requirements in one place, ensuring timely compliance.
10. **Grievance Redressal System** – Submit and track grievances with a best-in-class resolution rate of 98.28%, ensuring quick and efficient issue resolution.
11. **Seamless NSWS Integration** – Submitted data is automatically updated on the National Single Window System, ensuring synchronized and efficient approvals.

We invite you to experience **MAITRI 2.0** 's benefits firsthand to accelerate business growth. You are also requested to **create awareness in your district** to ensure maximum utilization of MAITRI 2.0 by industry stakeholders. We will provide all necessary support, including materials and demonstrations.

Let's work together to drive Maharashtra's industrial growth!

*MAITRI Single Window*

**Shri Deependra Singh Kushwah (IAS)**
Development Commissioner (Ind.) | Chairman (MAITRI)

e-Mail: didci@maharashtra.gov.in | maitri-mh@mah.gov.in

Phone: +91-22-22622322 | 22622361 | 22622362

*Click on the icons to follow MAITRI on social media for latest updates*

## आ) माहितीचे अध्ययावतीकरन

- कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजणांची अध्ययवत माहितीचे फलक कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात आले आहेत.

## इ) माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहितीचे स्वंयप्रकटीकरण

- माहिती अधिकार अधिनिमांतर्गत कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजणांची माहिती कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात आली आहे.

# ई) सुरक्षितता

- लागू नाही

# विषय क्र.2- सुकर जीवनमान
# नागरीसेवांचे सुलभीकरण

- राज्यातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांची नऊद्योजकतेकडे वाटचाल करण्यासाठी व रोजगारनिर्मिती करण्यासाठी पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम व मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती कार्यक्रम या महत्वपूर्ण योजना या कार्यालयामार्फत राबवल्या जातात. या योजनाच्या माध्यमातून सुलभरितीने योजनांचे लाभ देण्या करीता कार्यालयास्तरावर सीएमईजीपी/पीएमईजीपी कक्ष स्थापन करण्यात आला आहे. ज्या दवारे कार्यालयात येणा-या गरजू अभ्यगतांना / सुशिक्षित बेरोजगार युवक/युवती यांना योजनांन बाबत माहिती देण्यात येते.
- सदर योजना ऑनलाईन कार्यप्रणालीदवारे असल्याने इच्छूक अर्जदाराकडून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करुन त्यांचे अर्ज सीएमईजीपी कक्षा मार्फत ऑनलाईन पध्दतीने भरण्यात येवून परिपूर्ण व पात्र अर्जदारांचे अर्ज जिल्हा कार्यबल समितीच्या मान्यतेने संबंधित बँकाकडे मंजूरी करीता पाठविण्यात आले आहेत. 100 दिवसाच्या कार्यक्रमात बँकर्स ला योजनेची माहिती होऊन अर्जदारांना कर्ज मिळणे सुलभ व्हावे यासाठी वेळोवेळी बँकर्सच्या कार्यशाळा घेण्यात आल्या.

| सन 2024-25 करीता प्राप्त् उदिष्ट | |
|---|---|
| उदिदष्ट | मार्च-2025 अखेरीस साध्य |
| ५०३ | 520 |




लोकमत

छत्रपती संभाजीनगर, बुधवार, दि. १६ एप्र


# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती; ५२० जणांना कर्ज वितरित !

## महिलांचाही समावेश : रोजगाराचा प्रश्न मिटण्यास होणार मदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**हिंगोली :** मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाअंतर्गत २०२४-२५ या आर्थिक वर्षात जिल्हा उद्योग केंद्राने आपले उद्दिष्ट पूर्ण केले असून तब्बल ५२० जणांना कर्ज उपलब्ध झाले आहे. उद्योग, व्यवसायातून रोजगार निर्माण होण्यास मदत होणार आहे.

बेरोजगारी कमी होऊन तरुणांच्या हाताला काम मिळावे, कामानिमित्त मोठ्या शहरात होणारे स्थलांतर थांबावे, यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम शासनाने हाती घेतला आहे. यात उत्पादन व्यवसायासाठी ५० लाखांपर्यंत, तर सेवा उद्योग व्यवसायासाठी २० लाखांपर्यंत कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. त्यामुळे नोकरीच्या मागे न लागता स्वतःचा रोजगार थाटून आत्मनिर्भर बनण्याचे तरुणांचे स्वप्न पूर्ण होणार आहे. २०२४-२५ या वर्षासाठी ५०३ लाभार्थ्यांना कर्ज उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट जिल्हा उद्योग व खादी ग्रामोद्योग कार्यालयास मिळाले होते. त्यानुसार लाभार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज केले आहेत. यातील पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव बँकांकडे पाठविण्यात आले होते. त्यानुसार ५२० लाभार्थ्यांचे प्रस्ताव मंजूर झाले आहेत. कर्ज उपलब्ध झाल्याने उद्योग, व्यवसाय उभारण्यास मदत होणार आहे.

### काय आहे योजना?

राज्यातील युवक- युवतींना स्वयंपूर्ण आत्मनिर्भर बनविण्यासाठी, त्यांना कर्ज उपलब्ध करून देणे व या माध्यमातून रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

### निकष काय ?

योजनेत १० लाखांवरील प्रकल्पासाठी लाभार्थी ७ वी उत्तीर्ण, तर २५ लाखांवरील प्रकल्पासाठी १० वी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. वय कमीत कमी १८ तर जास्तीत जास्त ४५ वर्षांपर्यंत असावे. (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, महिला, दिव्यांग, माजी सैनिक यांच्यासाठी ५ वर्षे शिथिल) लाभार्थी कोणत्याही बँकेचा, पतसंस्थेचा थकबाकीदार नसावा, त्याचा सिबिल स्कोअर चांगला असावा.

### असे प्रस्ताव मंजूर

| | |
|---|---|
| एकूण उद्दिष्ट | ५०३ |
| जिल्हा उद्योग केंद्र | ३८१ |
| खादी व ग्रामोद्योग मंडळ | १३९ |

### जिल्हाधिकाऱ्यांचा पाठपुरावा

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत जिल्ह्याला ५०३ जणांना कर्ज उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट मिळाले होते.

डिसेंबर २०२४ पर्यंत बँकांकडून फारसा प्रतिसाद मिळत नव्हता.

मात्र, तत्कालीन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी जास्तीत जास्त लाभार्थ्यांना कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा केला.

जिल्हा उद्योग केंद्राचे अधिकारी, कर्मचाऱ्यांनीही बँकांकडे चकरा मारल्या.

त्यामुळेच जिल्ह्याला मिळालेले उद्दिष्ट पूर्ण झाले असून तब्बल ५२० लाभार्थ्यांना कर्ज उपलब्ध झाले आहे.

### मराठवाड्यात दुसरा क्रमांक

जिल्ह्याला मिळालेले उद्दिष्ट जिल्हा उद्योग केंद्राने पूर्ण केले. त्यामुळेच जिल्ह्याने विभागात दुसरा क्रमांक पटकावला, तर राज्यात आठव्या क्रमांकावर झेप घेतली आहे.

# विषय क्र.3- स्वच्छता
## अ) अभिलेख  निंदणीकरण  व  वर्गीकरण

| अक्र | वर्गीकरण | स्वरुप |
|---|---|---|
| 1 | अ | कायमस्वरुपी |
| 2 | ब | 30 वर्षा पर्यंत |
| 3 | क | 5 वर्षा पर्यंत |
| 4 | ड | 1 वर्षा पर्यंत |

# मुदतबाहय अभिलेखे नष्ट केल्याचा तपशिल

| अ क्र | योजना | स्वरुप |
|---|---|---|
| 1 | साप्रोयो-1993 | प्रलंबित अर्ज |
| 2 | साप्रोयो-2001 | प्रलंबित अर्ज |
| 3 | ईएम पार्ट-1 | प्रलंबित अर्ज |
| 4 | ईएम पार्ट-2 | प्रलंबित अर्ज |
| 5 | आस्थापना संकीर्ण | प्रलंबित अर्ज |

## इ) जड वस्तू संग्रह नोंदवही अदयावतीकरण

- जड संग्रह नोंद वही अध्ययवत आहे.

# ३) जुन्या वाहनांचे निर्लेखन

- सदयस्थिती या कार्यालयाकडे जुने वाहन नाही.

# विषय क्र.4- तक्रार निवारण
## अ) आपले सरकार पोर्टलवरील तक्रारींचे निवारण
## आ) पी जी पोर्टलवरील तक्रारीचे निवारण

| अक्र | पोर्टल | प्रलंबित अर्ज |
|---|---|---|
| 1 | आपले सरकार | 0 |
| 2 | पी जी पोर्टल | 0 |

## इ) अभ्यागत भेटीचे नियोजन व भेटीच्या वेळाबाबत प्रसिध्दी

अभ्यागत भेटीसाठीची वेळ व कार्यालयीन कामकाजची वेळ कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात आली आहे.

## विषय क्र.5 :- कार्यालयीन सोयी सुविधा
### अ) कायमस्वरुपी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था

- कार्यालयात येणा-या नागरिकांना कायमस्वरुपी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था कार्यालयातील प्रवेशदवाराच्या बाजूस करण्यात आलेली आहे. (पाण्याचे Jar )

## (आ) स्वच्छ प्रसाधनगृहाची व्यवस्था

- कार्यालय जिल्हाधिकारी कार्यालयात आहे. कार्यालयाच्या बाहेर प्रसाधनगृहाची व्यवस्था असून त्याची स्वछता रोजच्या रोज फिनाइल व आवश्यक रसायने वापरुन स्वच्छ केली जातात.

## (इ) अभ्यागतासाठी सुसज्ज्  प्रतिक्षालय व्यवस्था

- कार्यालयाच्या प्रवेशाजवळ अभ्यागतांसाठी प्रतीक्षालायची व्यवस्था आहे.

## (ई) कार्यालयामध्ये  सुव्यवस्थित नामफलक व दिशादर्शक फलक लावणे

- कार्यालयात येणा-या नागरिकांकरीता कार्यालयातील कर्मचारी व अधिकारी यांचे नावाचे नामफलक व दिशादर्शक फलक लावण्यात आले आहेत.

## (उ) कार्यालयाचे सोंदर्यीकरण

- कार्यालयामध्ये विविध आकर्षक वनस्पतींच्या कुंडया दर्शनी भागामध्ये व कार्यालयाचे सौंदर्य उठून दिसेल अशा ठिकाणी ठेवण्यात आल्या आहेत.

# विषय क्र.6 :- क्षेत्रीय कार्यालयांना भेटी

- **अ) आठवडयातून किमान दोन दिवस क्षेत्रीय कार्यालयांना भेटी देवून पाहणी करणे-**
  या कार्यालयाचे तालुकास्तरावर अथवा ग्रामस्थरावर कार्यालय अस्थित्वात नाही.
- **(आ) केंद्र व राज्य् शासनाच्या महत्वाच्या कार्यक्रम/ प्रकल्पांना भेटी देणे**

- मुख्यमंत्री रोजगारनिर्मिती योजनेअंतर्गत कर्ज प्राप्त करून उद्योग सुरु करण्यात आलेल्या उद्योजकांच्या उपक्रम ला उद्योग निरीक्षक भेटी देतात.



इ) क्षेत्रीय भेटी दरम्यान ग्रामपंचायत, शाळा, अंगणवाडी व प्राथमिक आरोग्य केंद्र यांना भेटी देवून कामकाजावर देखरेख :- लागू नाही-

ई) ग्रामस्तरावरील कर्मचा-यांचे अनुभव, अडचणी व सूचना यावर त्वरीत कार्यवाही करणे- लागू नाही

# विषय क्र.7- ई-ऑफिस प्रणाली

- अ) प्रशासकीय कामकाजात 1 जानेवारी 2025 पासून ई-ऑफिस प्रणालीचा वापर करणे - लागू नाही

- आ) ई-ऑफीस प्रणालीत 4 किंवा त्यापेक्षा कमी स्तरावर मान्यता घेवून प्रकरणांचा निपटारा करणे - लागू नाही

# विषय क्र.8 - आर्थिक व औदयोगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन

- **(अ) गुंतवणूकदार उदयोजकांना प्रोत्साहन देण्यासाठी पोषक वातावरण तयार करणे**

जिल्हयातील नवगुंतवणूकदार यांना प्रोत्साहन देण्या करीता उदयोग उभारणीसाठी केंद्र व राज्य् शासनाच्या जसे पंतप्रधान रोजगार निर्मिती योजना व मुख्यमंत्री रोजगार योजना बाबत मेळावे, शिबिरे घेवून जनजागृती केली जाते.100 दिवसाच्या कृतिआराखडयामध्ये जिल्हयात शिबिरे योजनांच्या प्रसिध्दी करीता घेण्यात आली आहेत.

हिंगोली जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषद दि. 09/04/2025 रोजी **हॉटेल “ शांती ” अकोला रोड, हिंगोली** येथे आयोजित करण्यात आली होती. सदर परिषदेमध्ये 205 सांमजस्य् करार करण्यात येवून त्यामध्ये 738.95 कोटीची गुंतवणूक आकर्षित आली आहे.





पुण्यनगरी

# हिंगोली जिल्ह्यात ७३८ कोटींची गुंतवणूक

**लवकरच सामंजस्य करार** ● **२०५ उद्योजकांचा असणार समावेश**

**हिंगोली :** गुंतवणूक परिषदेमध्ये हिंगोली जिल्ह्यात २०५ उद्योजकांनी ७३८ कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यासाठी महाराष्ट्र शासनासोबत सामंजस्य करार करण्यात येणार आहे, अशी माहिती उद्योग सहसंचालक बी.टी.यशवंते यांनी दिली.

उद्योग विभाग, उद्योग संचालनालय, जिल्हा उद्योग केंद्रामार्फत हिंगोली जिल्ह्यांतर्गत नवीन गुंतवणूकदारांचे संमेलन नुकतेच आयोजित करण्यात



**उद्योग सहसंचालक यशवंते यांची माहिती**

आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती संभाजीनगर विभागाचे उद्योग सहसंचालक बी. टी. यशवंते होते. यावेळी नांदेड जिल्हा उद्योग केंद्राचे व्यवस्थापक कदम, हिंगोली जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रवीण मोरे उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी मिटकॉन हिंगोलीचे प्रकल्प अधिकारी सुभाष जाधव, खादी ग्रामोद्योग अधिकारी वाघमारे, अधीक्षक पी. व्ही मेंढे, उद्योग निरीक्षक सुदेशना सवराते, एल. एस. दिपके, सय्यद युनूस, दत्ता उचितकर, सुभाष बोरकर, विकास उंडाळ, किशन धाबे यांनी पुढाकार घेतला.

## नवीन कायद्या संदर्भात मार्गदर्शन

मैत्री कक्षाचे नोडल अधिकारी सागर आवटे यांनी शासनाकडून उद्योजकांसाठी पुरविण्यात येणाऱ्या परवान्याबाबत अंमलात आलेल्या नवीन कायद्याविषयी मार्गदर्शन केले. तसेच सीडबीच्या अधिकारी बलखंडे यांनी सीडबीच्या कामाविषयी माहिती दिली. डॉ.विजय निलावार यांनी सूत्रसंचालन केले. प्रकल्प अधिकारी सुधीर आठवले यांनी आभार मानले.

Chhatrapati Sambhajinagar Edition
Apr 12, 2025 Page No. 08
Powered by: erelego.com

## आ) व्यापारी / कांमगार वर्गाच्या संघटनाशी चर्चा करुन त्यांच्या अडचणी सोडविणे.

जिल्हा उदयोग मित्र बैठकी मध्ये उदयोजकांच्या विविध अडचणी संदर्भात मा.जिल्हाधिकारी अध्यक्षतेखाली जिल्हयातील औदयोगिक संघटना व संबंधित शासकीय विभाग यांची बैठक घेवून उदयोजकांच्या अडचणी सोडविल्ल्या जातात.या बैठकीत औद्योगिक संघटनाच्या अडचणी समजुन घेऊन त्यावर तोडगा काढण्याचे निर्देश मा. जिल्हाधिकारी यांनी संबंधित विभागास दिले.



## इ) गुंतवणूकदार उदयोजकांच्या अडचणीचे निराकरण करणे

- मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली गुंतवणूकदार उदयोजकांच्या अडचणी बाबत दि17/02/2025 रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत गुंतवणूकदार उदयोजकांच्या अडचणीचे निराकरण करण्यात आले.

सकाळ

# शहरात उद्योग मित्र समितीची बैठक

## पाण्यासह अतिक्रमण, वीज पुरवठ्याचा प्रश्न उपस्थित

**हिंगोली, ता. २०** : शहरालगत लिंबाळामक्ता शिवारातील औद्योगिक वसाहत परिसरातील अतिक्रमण उद्योगांसाठी अडचण ठरली असून पाणी, वीज पुरवठ्याचा प्रश्न उद्योजकांनी उपस्थित केला. या प्रश्नावर तातडीने उपाय योजना करण्याचे आश्वासन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी उद्योजकांना दिले.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हा उद्योग मित्र समितीची बैठक नुकतीच झाली. यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल, औद्योगिक विकास महामंडळाचे इंगळे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अनिल कदम, जिल्हा औद्योगिक संघटनेचे उपाध्यक्ष नंदकुमार तोष्णीवाल, जिल्हा युवा अधिकारी आशिष पंत, उद्योजक खुराणा, रमेश पंडित, प्रवीण सोनी यांच्यासह उद्योजक उपस्थित होते. यावेळी उद्योजकांनी औद्योगिक वसाहतीमध्ये पाणीटंचाई, अतिक्रमण काढावे अशी मागणी केली. उद्योगांना सुरळीत वीज पुरवठ्याची मागणी उद्योजकांनी केली. हिंगोली शहराजवळ भूखंड मिळाल्यास अतिरिक्त औद्योगिक वसाहत स्थापन करून ती वेगाने विकसित होऊ शकेल. त्यामुळे शहराजवळ जमीन मिळविण्यासाठी प्राधान्याने प्रयत्न करावेत, अशा सूचना उद्योजकांनी यावेळी उद्योग विभागाला केल्या. औद्योगिक क्षेत्रातील पाणीटंचाई दूर करण्याचे काम सुरू आहे. त्याबाबत जलशुद्धीकरण केंद्र, जलवाहिनी टाकण्याच्या कामाचा आढावा जिल्हाधिकारी गोयल यांनी घेतला. औद्योगिक क्षेत्रात पाणीवापर धोरण बदलाबाबत निर्णय घेताना तसे बदल शासनाकडे सुचविण्यास मदत होईल, असे जिल्हाधिकारी गोयल यांनी सांगितले. लवकरच नवीन फीडरचे उद्घाटन होणार असून त्यामुळे उद्योगांना सुरळीत वीजपुरवठा मिळेल, असेही त्यांनी आश्वासन दिले.



**हिंगोली** : उद्योग मित्र समितीच्या बैठकीत मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी गोयल.

Nanded, Hingoli-Today1
21/02/2025 Page No. 1

# (ई) गुंतवणूकदारासाठी कायदा व सुव्यवस्था प्रभावीपणे हाताळणे

- दिनांक 17/02/2025 रोजीच्या जिल्हा उदयोग मित्र बैठकी मध्ये उदयोजकांच्या कायदा व सुव्यवस्था अडचणी संदर्भात मा.जिल्हाधिकारी अध्यक्षतेखाली जिल्हयातील औदयोगिक संघटना व संबंधित शासकीय विभाग यांची बैठक घेवून उदयोजकांच्या अडचणी सोडविण्यात आल्या.

## विषय क्र.9 :- अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI)

- (अ) नव्याने सेवत प्रविष्ठ कर्मचारी यांना प्रशिक्षित करणे :-

  या कार्यालयाकडे नव्याने रुजू झालेल्या उदयोग निरिक्षकांचा "कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधनी (वने) " पलूस, जि.सांगली येथे दि.14/04/2025 ते 25/04/2025 या कालावधीत पायाभूत प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण झाला आहे.



## (आ) कर्मचा-याच्या पदोन्न्त्या व तक्रारीचे निराकरण करणे

- कर्मचा-यांना पदोन्न्ती व आश्वासीत प्रगती योजनेचे लाभ देणेचे अधिकार उदयोग सहसंचालक व उदयोगसंचालनालय यांचेकडे आहेत.
- कर्मचाऱ्यांच्या काही तक्रारी असतील तर त्याचे निराकरण करण्यासाठी महाव्यवस्थापक प्रत्येक आठवड्याच्या शुक्रवारी कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्याशी संवाद साधतात व कर्मचाऱ्यांच्या अडचणी समजून घेतात.

# विषय क्र्.10- नाविन्यपूर्ण उपक्रम

कार्यालयामध्ये किमान 2 नाविन्य् पूर्ण उपक्रम राबविणे

योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत:

१०.३० ते ११ या वेळेत महाव्यवस्थापक यांचे दालनात सर्व अधिकरी व कर्मचारी यांची बैठक घेवून सीएमईजीपी योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना येणाऱ्या अडचणीवर चर्चा करण्यात येते. बँकेकडून काही अडचण येत असल्यास उद्योग निरीक्षक हे बँकेशी संपर्क करतात. बँकर्स ला योजनेची माहिती व्हावी व योजनेची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेतली जाते.

२. सिग्मा कक्ष :-

कार्यालयात येणा-या अभ्यगतांना एकाच ठिकाणी सर्व योजनांची माहिती देणे करीता कार्यालयाच्या दर्शनी भागामध्ये सिग्मा कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. यादवारे अभ्यगतांना कमी वेळामध्ये सर्व माहीती एकाच ठिकाणी प्राप्त् होते. त्यामुळे कार्यालयातील कामकाजाची कार्यक्षमता वाढली आहे. तसेच येणा-या अभ्यगातांना देखील समाधान प्राप्त होवून त्यांच्या सर्व समस्याचे निराकरण करणे सोयीचे झाले आहे.